**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**(अर्थसंकल्पीय विशेष सभा)**

बुधवार, दि. 29.03.2017 रोजी दुपारी 12.30 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम जवळील कै. शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर**

**सर्वश्री श्रीमती /**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कदम गंगाराबाई नारायण |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | सातेलीकर श्रीनिवास आशन्ना |
| पवळे उमेश देवराव | कंठेवाड सविता मारोतराव |
| चव्हाण आनंद शंकरराव | पांढरे स्नेहा सुधाकर |
| चव्हाण आनंद शंकरराव | फारुख अली खाँ इलीयास खाँ |
| मुंढे शांता मोतीराम | आनेवार गंगासागर संदीप |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| कदम शीला सुनील | प्रमोद मुरलीधराव खेडकर |
| वाजेदा तबस्सुम अथर अली खाँ | स.जानी म.कासीम |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश |
| जाधव जयश्री आनंद | गुर्रम विनयकुमार जगदिश |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | जिंदम पार्वती व्यंकटेश |
| उमरेकर अशोक रावण | मुदिराज कमलबाई रामस्वामी |
| चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह | रजिया बेगम अयुबखान |
| सलिमा बेगम नुरुल्ला खान | गाडगे शंकर जयवंतराव |
| देशमूख वैशाली मिलिंद | देशमूख बालासाहेब गंगाधराव |
| स.इतरत फातेम स.मजहुर हुसेन | गफारखान गुलाम महमंद खान |
| अनुजा अमितसिंह तेहरा | शर्मा पुष्पाताई राजेश |
| खेडकर ज्योती महेंद्र | गिल सरजितसिंध पंजाबसिंघ |
| अ. हबीब अ. रहिम बागवान | बिपाशा बेगम स.वलिवोध्दीन |
| अ. फसीया फिरदोस | अ.सत्तार अ.गफुर |
| आसीया बेगम अ.हबीब बागवान | स.शेर अली स.महेबुब अली |
| इतरत फातेमा अ.शमीम | कुरेशी चाँद पाशा खाजा |
| तेहसीन बेगम अ.समद | फारुख हुसेन कासीम साब |
| राखेवार सतिष शेषप्पा | चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस |
| अ.लतिफ अ.मजीद | गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल |
| सुदर्शना महेश (बाळु) खोमणे | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | ठाकूर अन्नपुर्णा जम्मुसिंह |
| सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ | मोरे संजय गंगाधरराव |
| अभिषेक रमेशराव सौदे | काकडे सिंधू पांडूरंग |
| देशमुख मंगला गजानन | सौ.ललिता मुंकुंदराव बोकारे |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| येवनकर विजय हिराचंद | कदम विश्वास बालाजी |
| अङ. बन शाम वामनराव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. शैलजा किशोर स्वामी, महापौर हे होते तसेच श्री समिर उन्हाळे आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त, विकास, श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. सौ. सुमती ठाकरे, प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री गिरीष कदम, कार्यकारी साबांवि, श्री सुग्रीव अंधारे कार्यकारी अभियंता पापु, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातील नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामूहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर.** स्थायी समितीची सभापती सौ. देशमुख मंगला गजानन, आयुक्त, सर्व स.सदस्य, अधिकारी कर्मचा-याचे स्वागत करुन आजच्या अंदाजपत्रकीय विशेष सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**विरोधी पक्षनेता** गुढी पाडवा हा ऐवढा मोठा सण होता या दिवशी उत्तर नांदेड मधील शहराला पाणी मिळाले नाही. पाण्याचा दिवस होता जास्तीचे पाणी सोडावयाचे नव्हते. रेग्यूलर पाणी सोडावयाचे होते. कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता हे उत्तर देत नाहीत यांना विचारा असे म्हणता. लोक आम्हाला विचारतात आम्ही

काय उत्तर दयावे. अधिकारी फोन उचलत नाहीत. आज आमच्यावर वेळ आली उदया 14 एप्रील, नंतर ईद येणार आहे. तसेच रस्त्यावर कचरा आहे, कचरा कधी उचणार त्याची उपाययोजना कधी करणार याचा बाबतचा खुलासा करावा.

**अ. सत्तार अ.गफुर** शहरात पाणी कोण्या दिवशी येते हे आम्हाला माहीत नाही वेळा काय हे आम्हाला स्पष्ट करावे. मनपाचा वर्धापन दिन का साजरा केला नाही कोण्या अधिका-याचे नियोजन केले नाही त्या अधिका-यावर कार्यवाही करण्यात यावी. किती निधी लागणार होता. सर्व साधारण सभा या ठिकाणी घ्यावी लागली एसी चालू नाही, लिफ्ट चालू नाही. हे काय चालू आहे. मनपाची परिस्थीती इतकी बिकट आहे काय. जया अधिका-याने लिफ्ट बंद ठेवली त्या अधिका-यावर आताच आता कार्यवाही करावी. पुर्ण पैसा पगारीवर खर्च होत आहे विकासाची कामे साठीनिधी नाही. गुढी पाडव्याच्या दिवशी पाणी दिले नाही हे योग्य नाही सणाच्या दिवशी पाणी देणे आवश्यक होते. 150 कोटीचे कर्ज घेत आहोत 150 कोटीचे कर्ज कसे फेडणार ते सर्वसाधारण सभेच्या समोर का आले नाही याचा खुलासा करावा.

**दिपकसिंह रावत** आम्हाला चांगले पाणी दिले पाहिजे. पाणी पुरवठयाच्या अधिकारी यांना बोललो. पाण्याची टंचाई आहे. सभागृहाची मान्यता घेतली काय हे सांगा. आता 16 टक्के पाणी पुरणार आहे काय ? एएमआरसी नाही, टॅक्टर, हापसे दुरुस्ती नाही, याबाबत आम्हाला सांगावे. तुमचे नियोजन शुन्य आहे. नगरसेवकांना विश्वासात घेतले काय ? एएमआरसीचे लेबर काम करत नाही. पिवळे पाणी आले आहे. नागरीकांनी काय करावे. मनपाचा वर्धापन दिन का साजरा केला नाही याचा खुलासा करावा. मा. मुख्यमंत्री साहेबांनी जरी 150 कोटीचे कर्ज मंजूर केले असेले तरी त्याचे 150 कोटी आपण कसे फेडणार ? आज एसी बंद, लिप्ट बंद, वर्धापन दिन साजरा केला नाही, पाणी पिवळे येते अशा अधिका-यावर आपण काय कार्यवाही करणार याचा खुसाला करावा.

**सौ.ललिता बोकारे** महीला दिनाच्या संदर्भात आम्ही मार्च महीण्यात आयुक्त साहेबांकडे गेलो होतो काय खर्च देणार असे म्हणले होते. महीला दिनाचे आयोजन केले होते हा कार्यक्रम एवढा यशस्वी झाला. या कार्यक्रमाला आयुक्त साहेबांची अनुपस्थिती होती. नियोजन आम्ही सर्वानी केले केवळ 80 हजाराचे बजेट या कार्यक्रमासाठी दिले होते आणि प्रशासनाने कोठेही जाहीरात केली नाही. प्रशासनाकडून योगय नियोजन करण्यास सहाकार्य करण्यात आले नाही. महिला दिनाचा कार्यक्रमाला अत्यंत कमी निधी दिला. महीला दिनाचा कार्यक्रम हा महीला दीन कार्यक्रम झाला या बाबतचा खुलासा पाहीजे. ब-याच नगरसेवकांना पत्रीका सुध्दा पोहचल्या नाहीत. महीलांनी चांगला कार्यक्रम करुन दाखविला आहे. संबधीत अधिकारी आहेत यांच्यावर या कार्यक्रमाची जबाबदारी सोपविण्यात यावयाला पाहीजे. ती सोपविण्यात आली नाही. मा. महापौर मॅडम आपण आम्हाला शाबासकी दिली आहे परंतू वृतपत्रातून या कार्यक्रमाची माहिती जनतेपर्यत प्रशासनाने पोहचविली नाही बजेटमध्ये किती तरतुद केली आहे. तो खर्च का करत नाही.

**सौ. रजिया बेगम** आम्ही सभागृहात प्रश्न मांडतो तरीही काम होत नाही. पत्र दिल्यानंतरही काम घेत नाही माझ्या वार्डात पाण्याची लाईन टाकण्यासाठी पत्र दिले होते. रस्ते नाही नाल्या नाहीत. आम्ही बोलतो तरीही कामे होत नाहीत. संबधीत अधिकारी काम करीत नसल्याने आम्हाला नागरीक विचारात काम कधी होणार म्हणून आम्ही कार्य उत्तर दयावे. काल पाणी अकरा वाजता आले. पाणी उशिरा येणार आहे म्हणून अधिकारी फोन लावून सांगत नाही. फोन लावला तर उचलत नाहीत. दोन दिवसाला पाणी येण्याचे नियोजन आहे. पण पाणी मिळत नाही. माझ्या वार्डात पाण्याच्या पाईप लाईनचा काय झाले याचा खुलासा करण्यात यावा.

**अभिषेक सौदे** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व उत्तर प्रदेशचे सिएम यांनी घवघवीत यश मिळवले आहे. त्याबाबवही अभिनंदन करतो.

**गोंधळ चालू झाला.**

**अभिषेक सौदे** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी मनपाला रु. 150 कोटीचे कर्ज मंजूर केले आहे त्यांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो.

**सभागृह नेता** ही मिटींग बजेटची असल्यामुळे बजेटवर चर्चा करण्यात यावी.

**महापौर** ही मिटींग विशेष सभा असल्याने त्यामुळे बजेटवर चर्चा करावी इतर विषयावर चर्चा करु नये.

**अभिषेक सौदे** नगरपालिका प्रशासन हे दुषीत पाणी पुरवठा करीत आहे त्यांच्यावर आपण कार्यवाही करणार नाही काय ते सांगा.

**महापौर** सदस्यांनी आप आपल्या जागेवर बसावे.

**गोंधळ सुरु होता.**

**महापौर** पाणी पुरवठा या बाबत जी बाब स. सदस्यांनी उपस्थित केली आहे ती बरोबर आहे. कार्यकारी अभियंता म्हणतो उप अभियंता म्हणतो कनिष्ट अभियंता म्हणतो वॉलमनला माहित असेल अशी सर्व प्रक्रिया चालत असेते ही बा सत्य आहे वरिष्ठ अधिका-यांनी पाण्याच्या नियोजनाबाबत काहीही माहीत नाही वरिष्ठ अधिका-याकडून पाण्याचा चार्ज काढून घेण्यात यावा. मनपाची महीण्या भरापासुन लिप्ट बंद आहे. ही अत्यंत

खेदाची बाब आहे. इमारतीतील मेटन्सचे काम विदयूत विभागाने त्वरीत पुर्ण करावे जेष्ठ नगरसेवक मिटींगला कसे जातील याकडे लक्ष दयावे. या मनपाचा वर्धापन दिन घेण्यात आलेला नाही सर्व अधिकारी हे मनपावर आधारीत आहेत. नगरसेवक अधिकारी पदाधिकारी यांचे मनोगत एका दिवशी सर्वांना ऐकायला मिळाले असतेत्यांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या मनपात आपण साजरा केला नाही यापेक्षा खेदाची दुसरी गोष्ट असू शकत नाही. विधुत विभागाने लिफ्ट बंद ठेवल्याने याचा आयुक्तांनी खुलासा करावा. पाणी पुरवठयाच्या संदर्भातील आढावा नियोजन, पदाधिकारी, नगरसेवक व अधिकारी बसून विचार करावा गेल्यावर्षी पाण्याची गंभीर परिस्थिती असूनही पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे करण्यात आले होते.

**विरोधी पक्षनेता** अधिकारी जर हे आपणास काही सांगत नसतील तर त्यांना फोन केल्यास ते फोन उचलत नाहीत हे पाण्याचे काय नियोजन करतात हे आपणास माहित नाही ते मनाचे अधिकारी आहेत काय सभापती, विरोधी पक्षनेता यांना विश्वासात घेवून कामे का केली जात नाहीत याचा खुलासा करावा.

**उप अभियंता (विधुत)** मेंटन्सच्या कंत्राटदाराचे देयके दिले नसल्यामुळे विषय प्रलंबित राहत आहेत व्हीआयपी लिफ्ट ही अद्याप पर्यंत चालू होईल. इतर लिप्ट आठ दिवसात चालू करण्यात येतील.

**सभागृह नेता** आपला वर्धापन दिन साजरा करण्यात आलेला नाही. वर्धापन दिनाला 20 वर्षे पुर्ण झाल्याबददल सर्वांना शुभेच्छा देतो. पाण्याचे नियोजनासाठी आम्हाला बोलावले नाही तरी चालेल पण त्याची माहिती पदाधिका-याला देणे आवश्यक होते. गेल्या पाण्याच्या संदर्भात आम्हाला विश्वासात घेवून पाण्याचे नियोजन करण्यात आले होते. पाणी पुरवठा सणा सुदीच्या दिवशी केला जात नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे काल पाडवा होता नंतर इतरही सण येणार आहेत नागरीकांना आम्हाला उत्तर दयावे लागते. तुमचे अधिकारी पगार कशाची होतात हे आम्हाला कळत नाही नगरसेवकांनी सांगीतल्यानंतरच आपण काम करणार आहात काय अन्यथा आपली जबाबदारी असणार नाही काय ? एका महिण्यापुर्वी विदयूत विभागास लिप्ट बाबत सुचना देण्यात आल्या होत्या परंतू त्यांवर काही कार्यवाही करण्यात आली नाही. जेव्हा आयुक्त हे आदेशीत करतात तेव्हाच काम केल्या जाते हे चुक आहे. काम करुन घेवून कार्योत्तर मान्यतेसाठी स्थायी समितीला प्रकरण पाठवण्यात येते. कार्योत्तर काम करुन देण्यासाठी आपण त्यांना पर्याय दिला का एक लाखापर्यंतचे अधिकार त्यांना प्रदान केले आहेत. जेटींग मशीनही ब-याच दिवसापासुन बंद आहे. प्रत्येक नगरसेवकाला ड्रेनेजसाठी दहा फोन येत असतील रुपये 2.5 लाक्षाच्या कामासाठी कोणी येत नाही जेटींग मशीन नादुरुस्त आहे. त्याचा पर्याय काय आहे. याचा शोध घेतला पाहीजे आम्ही पीडब्ल्यूडी, रेल्वे, एरीगेशन यांच्याकडे पाहणी केली. त्याचे काम का केले जात नाही. एखादयाला मेटेन्ससाठी काम दिले तर होईल ते काम होत नसेल तर त्यावर काय पर्याय आहे. आमल्या मनपाला 20 वर्षे पुर्ण झालेले आहेत तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांनी जो 150 कोटीचा निधी मंजूर केला त्याबदल त्यांचे अभिनंदन. यानंतर नांदेडचे खासदार चव्हाण साहेब, श्री सावंत साहेब, श्री राजूरकर साहेब, श्री पाटील साहेब, या सर्वांनी सुध्दा कर्ज मंजूरीसाठी प्रयत्न केले त्यांचे या ठिकाणी आपण आभार व्यक्त केले पाहीजे. ज्या ठिकाणी काही सुविधा करायच्या झाल्यास अशा भागातील नागरीकांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. चकरा मारल्यातरी नागरीकांची कामे होत नाहीत ही बाब योग्य नाही. मनपा अधिका-यावर कोणाचेही निर्बंध नाहीत ते कोठे जातात. काय करतात हे माहित नाही. कार्यालयाला कुलूप कोण लावते याचाही खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** जोपर्यंत लिफ्ट चालू होत नाही तो पर्यत संबधीत अधिका-याला निलंबित करण्यात येते. ही संस्था केवळा पगारी करण्यासाठी नाही माझ्याकडे उपमहापौर आले ते त्यांनी फार दम लागला होता. एका वयस्कर 70 वर्षाचा व्यक्ती माझ्याकडे आला होता. ज्यांना काम करावयाचे नाही त्यांनी नौकरी सोडावी ही बाब वारंवार सांगितली जाते तरीही कामे होत नाहीत व त्याचा त्रास नागरीकांना होत असेल त्या वेळी कठोर निर्णय घ्यावेचे लागतात. जोपर्यंत लिफ्ट चालू होत नाही तो पर्यत विधुत अभियंता निलंबित राहतील. पाण्याच्या संदर्भात आपण वारंवार बैठका घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या त्याची अंमलबजावणी का झाली नाही कार्याकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी याबाबत सांगावे.

**महापौर** पाण्याच्या नियोजनाबाबत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता पापु** काल रात्री पासुन पाणी पुरवठा करण्याचे नियोजन केले होते पण ऐनवेळी टाकी न भरल्यामुळे गॅप आला. पाणी आणखी मिळण्यासाठी टाक्या भरायचे नियोजन केले टाकी भरुन सोडण्यासाठी बराच वेळ लागला त्यामुळे लोकांना पाणी मिळाले नाही. कैलासनगर, श्रीनगर, पिरबु-हानगर या भागातील पाणी विलंबाने मिळाले यांना वेळेवर पाणी न मिळाल्याने पुन्हा परत पाणी दयावे या उददेशाने संप भरण्यात आले त्यामुळे वेळ लागला. सध्या आपल्याकडे 17 एमएमक्युब पाणी शिल्लक आहे. दिग्रस बंधा-यातून आपण 10 एमएमक्यु

पाणी 2 एमएमक्यू पाणी आसना नदीकडून घेतलेले आहे. येणा-या तीन महिण्यात आपणास एवढे पाणी पुरेल अशी व्यवस्था आपण केली आहे. आपण आसणाकडून मार्च, एप्रील मेचे रोटेशन आपणास मिळणार आहे. काल सकाळी त्या भागातील सकाळी 6 वाजता वॉलचा प्रश्न निर्माण झाला त्यामुळे विलंब झाला.

**सरजितसिंह गिल** — अधिकारी हे आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे न सांगता दुसरीचे बाब नमुद करीत आहेत. महापौर, सभापती विरोधी पक्षनेता व इतर पद अधिका-यांना विश्वासात घेतले काय याबाबतची माहीती दया.दोन दिवसा आड, तीन दिवसा आड, पाणी दया पण सभागृहास विश्वासात घेतले नाही ही बाब गंभीर आहे. आमचे सीएम साहेबं खेडकर, नगरसेवक यामुळे मनपा झाली. त्या मनपाचा वर्धापन दिन प्रशासनाने साजरा केला नाही यातील संबधीत अधिका-यावर कार्यवाही करावी.

**बाळासाहेब देशमुख** — निलंबीत अधिका-याने सभागृहाचे बाहेर जावे.

**दिपकसिंह रावत** — पाणी पुरवठयाचे नियोजन हे उत्तर नांदेडसाठी सांगीतलेले आहेत. दक्षिण नांदेडचे लोक काय टॅक्स भरत नाहीत काय ? त्यांच्या पाणी नियोजनाबाबत खुलासा करावा. मा. आयुक्त साहेब आपण धडक निर्णय घेतला त्याबाबत आपले अभिनंदन आपण असेच निर्ण घ्यावे आम्ही तुमच्या पाठी मागे आहोत.

**महापौर** — पाणी नियोजनाची माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता पापु** — 10 एमएमक्यू पाणी नदीत आले तर दक्षिण नांदेडला पाणी कमी पडणार नाही. पाण्याच्या संदभ्ारती एक नोट तयार करुन देण्यात येईल.

**महापौर** — तुमच्याकडचा अतिरिक्त पदभार काढल्यामुळे तुम्हाला अता काम करण्याची जास्त संधी आहे तुम्ही पदाधिका-याला योगय पदधतीने बोलाव. आवण ज्या उपाय योजना करणार आहोत त्याची माहिती जनतेला करुन वृत्तपत्रातही प्रसिध्दी करावी.

**विनय गुर्रम** — श्री अंधारे सर हे गोल गोल उत्तर देत आहेत. सविस्तर माहीती देण्यासाठी सांगावे.

**स. शेर अली** — नांदेड शहराच्या दक्षिण भागात एक डब्ल्यूटीपी आहे. त्या मुळे शहरात नेहमीचा प्रश्न निर्माण होत आहे त्यासाठी एक डब्ल्यूटीपीचे बांधकाम करण्याची मंजूरी देण्यात यावी. कर्मचारी यांना दोषी न ठरविता आपण नियोजन केले पाहीजे. ही तांत्रिक अज्ञचण आहे त्यामुळे अधिका-याला दोषी धरण्यात येवू नये.

**महापौर** — अदांजपत्रकाची ही विशेष सभा आहे.

**श्रीमती सोनाबाई मोकले** — एका अधिका-याला फोन लावला तर म्हणतो दुस-याल लावा. दुसरा म्हणतो तिस-याल लावा. आम्ही काय फोनच करत रहावे काय. पुढे तीन महिने उन्हाळा आहे आताच असे म्हणतात तर पुढे कसे होईल. 11.00 वा पाणी येते. 12.00 ते 12.30 वा पाणी भरण्यासाठी वाजतात शहरातील नागरीक येवून म्हणतात आम्हाला पाणी नाही काय करावे ते सांगा अशाने आम्हाला कोण निवडून देणार ते सांगा.

**गोंधळ सुरु झाला.**

**महापौर** — वर्धापनाबाबत आयुक्तांनी खुलासा करावा.

**आयुक्त** — 26 मार्च हा आपला वर्धापण दिन आहे या कालावधीत आपला मार्च एण्डची वसूली असल्याने या कार्यक्रमाचे नियोजन येत्या 15 दिवसात करुन साजरा करण्यात येईल.

**फारुख हुसेन** — कच-याचा विषय हा अत्यंत गंभीर आहे आमच्या भागात कचरा उचलण्यासाठी कोणीही येत नाही कचरा तात्काळ उचलण्यात यावा. मी एक शेर म्हणतो. (शेरमध्ये उल्लू या शब्दाचा उल्लेख झाला)

**बाळासाहेब देशमुख** — आम्हाला त्यांनी उल्लू म्हणजे त्यामुळे त्यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावे. संबधीतास निलबिंत करावे.

**गोंधळ सुरु झाला.**

**सभागृह नेता** — माफी मागण्यास सांगावे,

**गोंधळ सुरु राहीला.**

**शेख बावजीर** — त्यांचा पहीले खुलासा मागवण्यात यावा.

**फारुख हुसेन** — मी महापौर पदाधिकारी नगरसेवक यांना म्हणलो नसुन जे अधिकारी काम करीत नाहीत त्यांना उददेशून म्हणालो आहे. मी सभागृहातील असा उल्लेख करण्याचा प्रश्नच येत नाही.

**बाळासाहेब देशमुख** — एका कर्मचा-याला निलबिंत केले यांना कर करत नाही ते आम्हाला सांगावे त्यांनाही निलबींत करावे.

**फारुख हुसेन** — मी कोणाचेही नाव घेवून म्हणालो नाही जर कोणाच्या भावना दुखावल्याअसतील तर मी माफी मागतो.

**गोंधळ सुरुच होता.**

**महापौर** — अर्थसंकल्पीय सभा सुरु करण्यात यावी.

**विषय क्र. १ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या अधिन राहून मा. आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी सादर केलेले व स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार केलेल्या शिफारशी नुसार सालसन २०१६-२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करणे बाबत.

| | |
|---|---|
| **सौ. देशमुख मंगला गजानन,** सभापती स्थायी समिती | सभापती यांनी सालसन २०१६-२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी आपले मनोगत वाचुन दाखविले. सभापती स्थायी समिती यांनी सर्वसाधारण सभेस बजेट सादर केले. |
| **सभागृह नेता** | पहिल्यांदाच सभापती महोदयांनी अभ्यास पुर्ण अर्थसंकल्प सादर केला आहे त्यांचे मी अभिनंदन करतो व त्यांच्या सहका-यांनी अभ्यास पण अर्थसंकल्प सादर केला आहे त्यांचेही मी आभार व्यक्त करतो. मागील 2 ते 3 वर्षापासून आपण मार्चमध्येच बजेट सादर करीत आहोत यावर्षी आपण बजेट सादर केले आहे विरोधी पक्षनेत्यांना बजेटचा अभ्यास करण्यासाठी वेळ लागतो त्यांना 2 ते 3 दिवसाचा वेळ देण्यात यावा. येणारे वर्ष हे आमचे निवडणूकीचे वर्ष आहे एप्रीलमध्येच आमचे स्वेच्छा निधीचे कामे करण्यात यावी म्हणजे टेंन्डर काढण्यासाठी मे महीना येईल. |
| **विरोधी पक्षनेता** | ते सध्याचे ऍक्टींग महापौर आहेत. त्यांना सगळे माहित आहे. एखादया वेळेस महापौराला माहिती नसेल पण त्यांना माहित असते. मनपाचे बजेट हे स्थायी समितीने सर्वसाधारण सभेस विहीत मुदतीत सादर केले त्याबदल सभापती व त्यांचे सहकारी यांचे मी अभिनंदन करतो. 31 मार्चला सर्व अधिकारी वर्ग हा वसुलीच्या कामात व्यस्थ असतो त्यामुळे 1 किंवा 2 तारीख येवून बजेटची बैठक घेण्यात यावी. |
| **सभागृह नेता** | अंदाजपत्रकीय विशेष सभा 1 तारखेला ठेवण्यात यावी. |
| **अ. सत्तार अ. गफुर** | 31 तारखेला ठेवण्यात यावे. |
| **महापौर** | सभागृहनेता यांनी जो प्रस्ताव मांडला त्यानुसार अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात येते सदरची सभा तहकुब करण्यात येते. सदरची सदरची सभा दि. 01.04.2017 रोजी घेण्यात येईल याची सर्व सदस्यांनी नोंद घ्यावी. |

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| नावाशमनपा नांदेड | नावाशमनपा नांदेड |